# संगीतकार अन् गीतांच्या उलगडल्या कहाण्या

## डॉ. मृदुला दाढे-जोशी यांच्या सादरीकरणाला दाद

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

नौशादांपासून सी. रामचंद्रांपर्यंत, शंकर-जयकिशन, कल्याणजी-आनंदजींपासून ते थेट आताच्या अजय-अतुलपर्यंत अनेक संगीतकारांच्या शैली, लकबी अन् त्यांनी बांधलेल्या गीतांमागच्या कहाण्या ऐकून श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.

निमित्त होते प्रसिद्ध गायिका, लेखिका डॉ. मृदुला दाढे-जोशी यांच्या 'नौशाद ते अजय-अतुल : एक संगीतप्रवास' या कार्यक्रमाचे. के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या वतीने कर्मवीर बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेचे अठरावे पुष्प या कार्यक्रमाने गुंफण्यात आले. ज्येष्ठ गायक पं. शंकराव वैरागकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शंकराचार्य संकुल येथे सोमवारी (दि. १७) हा कार्यक्रम झाला. त्यात डॉ. दाढे-जोशी यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतील



महत्त्वाच्या संगीतकारांची कारकीर्द त्यांच्या आगळ्या शैलीत उलगडून दाखवली. नौशाद, सी. रामचंद्र, एस. डी. बर्मन, जयदेव या हिंदीतील व सुधीर फडके या मराठीतील संगीतकाराकडे अद्‌भुत प्रतिभा होती. पूर्वी संगीतकार गाण्यातील शब्द, भाव, प्रसंग यांचा बारकाईने विचार करून गाणे बसवत असत. 'अभिमान'ची नायिका ही गायिका असल्याने तिच्या प्रत्येक गाण्याआधी आलाप आहे. 'गाइड'मधील 'काँटो से खीच के' या गीतात बंडखोरी अनुभवता येते. शंकर-जयकिशन यांच्याशिवाय हिंदी चित्रपटसृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. हिंदी चित्रपट संगीताला जागतिक स्तरावर नेणारी ही जोडी होती. करुण वा दुःखी भाव असलेली गाणी संथ लयीतच असावीत हा समज या जोडीने मोडून काढला. त्यांनी अनेक दुःखी गाणी वेगवान शैलीत केली. 'आवारा हूँ'ची चाल साधीसोपी वाटते; पण त्यातील प्रत्येक शब्दातून नायकाची बेफिकिरी झळकते, असे डॉ. दाढे-जोशी म्हणाल्या.